शिक्षा अंतीम करणे बाबत (श्री.बाळू जगन्नाथ डोळस,
तत्कालीन ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत वडगाव,
ता.कोपरगाव)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/३८५ /२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ :-१.या कार्यालयाचे दोषारोप/ ज्ञापन ग्रापं-३/८३९ /२०२३ दिनांक ०१/११/२०२३
२.या कार्यालयाचे आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/१५९/२०२४,दिनांक ०८/०४/२०२४ (सादरकर्ता अधिकारी नियुक्ती)
३. सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र.विशा.४/खाचौ / सी.आर.२४७/२०२३, दिनांक- ३१ जुलै २०२४ (प्राप्त दिनांक १४/१०/२०२४)
४.गटविकास अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/२४९/ २६, दि.०९.०३.२०२६ नुसार श्री डोळस यांचा सेवा विषयक तपशील
५.या कार्यालयाची अंतीम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/२४९८८५०/२६,दि.०६/०७/२६.
६. श्री डोळस यांना दिलेले वसुली आदेश क्र.ग्रापं-३/२४९८८४८/२६, दि.०६/०७/२०२६.
७. श्री.बाळू जगन्नाथ,डोळस,तत्कालीन ग्रामविकास अधिकारी अंतीम कारणे दाखवा नोटीस पोहोच दिनांक १३/०७/२०२६.
८.गटविकास अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/७६३/ २६, दिनांक २७/०७/२०२६.
९.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (५)

संदर्भ क्रमांक १ अन्वये, श्री.बाळू जगन्नाथ डोळस,तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वडगाव,ता.कोपरगाव त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी अपहार करुन गैरवर्तन केल्याने दोषारोपपत्र बजावणेत आले होते. संदर्भ क्रमांक २ नुसार श्री.बाळू जगन्नाथ डोळस, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वडगाव, ता.कोपरगाव यांचे गैरतर्वनाविरुध्द विभागीय चौकशी सुरु करणे कामी चौकशी अधिकारी यांची नेमणुक करण्यात आली होती.

संदर्भ क्रमांक.३ नुसार सहाय्यक चौकशी अधिकारी नाशिक विभाग नाशिक यांनी चौकशी पुर्ण करुन चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. चौकशी अहवालामध्ये पुढीलप्रमाणे आरोपांच्या चौकशीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत. श्री.बाळू जगन्नाथ डोळस,तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वडगाव, ता.कोपरगाव यांचे वर चौकशी करण्यात आलेल्या ०१ दोषारोपांपैकी ०१ आरोप सिध्द झाले आहेत.

विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास सहमती दर्शविलेली असल्याने श्री.बाळू जगन्नाथ डोळस,तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वडगाव, ता.कोपरगाव यांनी कार्यालयीन कामी अपहार करुन गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. त्यामुळे त्यांना संदर्भ क्र.५ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त वं अपील) १९६४ मधील नियम ४ (५) नुसार सक्तीने सेवानिवृत्त करणे,ही शिक्षा अंतिम का करण्यात येऊ नये? याबाबतची अंतीम कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. खुलासा सादर न केल्यास अंतीम कारणे दाखवा नोटीस मध्ये नमुद केलेली शिक्षा तुम्हास मान्य आहे, असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही

करण्यात येईल, असे कळविण्यात आलेले आहे. संदर्भ क्रमांक ७ अन्वये श्री.बाळू जगन्नाथ डोळस, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांची दि.१३/०७/२०२६ ची अंतिम कारणे दाखवा नोटीस पोहोच प्राप्त झाली आहे. संदर्भ क्र.८ नुसार श्री.बाळू जगन्नाथ डोळस, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांनी कोणताही खुलासा गटविकास अधिकारी यांच्या मार्फत सादर केलेला नाही. यावरुन श्री डोळस यांना अंतिम कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद केल्याप्रमाणे शिक्षा मान्य असल्याचे सिध्द होते.

श्री.बाळू जगन्नाथ डोळस,तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वडगाव,ता.कोपरगाव त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी अपहार करुन गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक)नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केलेला आहे. त्यामुळे श्री डोळस बाळू जगन्नाथ, तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांना देण्यात आलेल्या अंतीम कारणे दाखवा नोटीसमधील महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) १९६४ मधील नियम ४ (५) नुसार पुढील सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त करणे, ही शिक्षा या आदेशान्वये अंतीम करण्यात येत आहे. सदर आदेशाची नोंद संबधिताच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०९३००६०१८२........ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 30-09-2026 15:12:18
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत:-

१. श्री.बाळू जगन्नाथ डोळस,तत्कालीन ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत वडगाव,ता.कोपरगाव द्वारा व प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर.

२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर.

२/- सदर आदेशाची नोंद संबधिताच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. गटविकासअधिकारी, पंचायत समिती कोपरगाव.

४. कार्यासन १ व २ ग्रामपंचायत विभाग,जि.प.अहिल्यानगर.

५. निवड नस्ती.